8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जास्त नको रास्त पाहिजे - दिलीप राठी

## आत्मदहनाच्या ईशाऱ्याला गांभीर्याने घ्या, अन्यथा देशात जालना वेगळ्या मुद्द्यांवर गाजेल; आंदोलक शेतकऱ्यांचा ईशारा

जालना । प्रतिनिधी - समृद्धी महामार्ग बाधित शेतकऱ्यांनी आत्मदहनाचा ईशारा देऊन दहा दिवस उलटत आहेत, मात्र, आत्म दहनाच्या ईशाऱ्याला शासन गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून येत आहे. या ईशाऱ्यानंतर आंदोलनस्थळी साधा एक पोलीस कर्मचारी सुद्धा हजर नसल्याची शोकांतिका शेतकरी दिलीप राठी यांनी येथे व्यक्त केली. त्याचबरोबर आंदोलनस्थळी वेगवेगळ्या पद्धतीने आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न शेतकऱ्यांनी केला, किंवा या ठिकाणी काही बरेवाईट झाले तर यास जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित करत शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घ्या अन्यथा देशात जालना वेगळ्या मुद्द्यांवर गाजेल असा ईशाराही श्री राठी यांनी दिला. ते शुक्रवार (दि ३१) रोजी पत्रकारांशी बोलत होते. यावेळी आंदोलक शेतकऱ्यांसह शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णू पाचफुले माजी आ. संतोष सांबरे, समाधान शेजूळ यांच्यासह शेतकरी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी श्री राठी म्हणाले की, समृद्धी महामार्गासाठी जमिनी अधिग्रहणासाठी दिला जाणारा मोबदला अत्यल्प आहे. बाजार भाव जवळपास दोन कोटी रुपये आहे. एन-ऐ ग्राह्य धरल्यास जवळपास अडीच ते तीन कोटींपर्यंत भाव मिळू शकतो, असे असतांना केवळ २५ लाखांचे मुल्यांकन काढण्यात आले आहे. मुल्यांकन ठरवितांना देखील अधिकाऱ्यांनी दुजाभाव केला आहे. प्रत्यक्ष शेतात विहिर असतांना त्या जमिनीला जिरायती ठरविण्यात येते, मोसंबीचे झाडे आहेत, त्याला रोपे ठरविल्या जात आहे., वीस-पंचवीस वर्षांपुर्वीची झाडे आहेत. ती झाडे सध्या कापून विकल्यास वीस हजारांपेक्षा अधिक मुल्य मिळतील, अशा झाडांसाठी दहा-वीस रुपयांचे मुल्य ठरविले कसे असा प्रश्नही यावेळी श्री राठी यांनी उपस्थित केला. हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे. शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी अनेक वेळा आंदोलने करण्यात आली. भीक मागो आंदोलनही करण्यात आले. माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जालना दौऱ्यावर आले असतांना त्यांनी यात लक्ष घालण्याचे आश्वासन देखील दिले होते. आ. अर्जुनराव खोतकर यांनी देखील जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला. आ. खोतकर यांनी सांगितल्यानंतरही जिल्हाधिकारी, एसडीएम व नगर विकासचे अधिकारी मुग गिळून गप्प आहेत. आमदारांनही सांगितल्यानंतरही हे अधिकारी सांगतात आमच्या हातात काही नाही तर मग कुणाच्या हातात आहे, यात जिल्हा प्रशासनाची भागीदारी असल्याचा आरोप करत थेट ५ ते १० टक्के हे अधिकारी घेत असतील असा आरोप श्री राठी यांनी यावेळी केला.

२२ तारखेला आत्मदहनाचा ईशारा देण्यात आला आहे. त्यानंतर २४ तारखेला देवमुर्तीच्या तीस शेतकऱ्यांनी निवेदन देत आत्मदहनाचा ईशारा दिला. नंतर पुन्हा १०० शेतकऱ्यांना आत्मदहनाचा ईशारा दिला आहे. जवळपास दोनशे शेतकऱ्यांनी आत्मदहनाचा ईशारा दिल्यानंतरही प्रशासन त्याची दखल घेत नाही. आंदोलनस्थळी पोलीस प्रशासन साधी विचारपुस करायला देखील येत नाही. आत्मदहनाचा इशाा दिला हे जर नाटक वाटत असेल तर काय आमचे कुटुंब आम्ही उघड्यावर सोडणार आहोत काय? पायातला हातात घेऊ देऊ नका, देशात जालना वेगळ्या मुद्यांवर गाजेल असा ईशारा देत आम्ही ४ फेब्रुवारीपर्यंत वाट पाहणार आहोत. त्यानंतर आंदोलन कोणत्या थराला जाईल त्याचे परिणाम काय होतील याची सर्वस्वी जबाबदारी ही जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, नगर रचनाकारचे अधिकारी यांच्यावर राहील. याठिकाणी वाटूर, वाई, जयपूर, केंधळी, नसडगाव, शेवगा, हस्ते पिंपळगाव, रामनगर, पानशेंद्रा, देवमुर्ती आदी जालना, मंठा व परतूर तालुक्यातील शेतकरी आंदोलन करत आहेत. कोणी कुठेही आत्महत्त्या करेल कुणी लिंबाच्या झाडाला गळफास लावून घेईल, कुणी टॉवरवर चढेल, कुणी जिल्हाधिकारी कार्यालयात, कुणी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाल तर कोणी कुठे कुणा कुणाला कसे थांबविणार? प्रशासनाने शेतकऱ्यांच्या मागण्या गांभीर्याने घ्याव्यात आम्ही जे म्हणतोय ते नाही, आम्हाला शासनाचे अधिकचे नको म्हणजेच आम्हाला जास्त नको रास्त पाहिजे असे म्हणत यासाठी एखादी समिती नेमा त्या समितीत सुनील केंद्रे, विजयकुमार फड सारखे अधिकारी, दोन पत्रकार, दोन सामाजिक कार्यकर्ते, दोन शेतकरी घ्या व त्यांना ठरवू द्या. शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही याची खात्री आंदोलनस्थळी येऊन दिली तरच हे आंदोलन थांबेल, हाताबाहेर परिस्थती जाण्याअगोदर येथे या सकारात्मक चर्चा करा असे आवाहनही श्री राठी यांनी यावेळी प्रशासनाला केले.



माजी आमदार गोरंट्याल यांच्यावरही श्री राठी यांनी आरोप केला. एक हजार कोटींचा भ्रष्टाचार झाला म्हणून माजी आ कैलास गोरंट्याल यांनी ओरड केली आणि त्यामुळे हा प्रकल्प लांबला, मुलगा जन्मालाच आला नाही आणि यांनी बारसे केले असे शायराना अंदाजात म्हणत या शायरीवाल्याने आता सांगावे की जेव्हा नांदेड -जालना समृद्धी महामार्गाच केवळ घोषणा झाली त्यानंतर लागलीच एक हजार कोटींचा घोटाळा कसा झाला. त्यांच्यामुळे अडीच वर्षे हा प्रकल्प लांबला. आता नव्याने प्रकल्प सुरु झाला आहे. अशावेळी त्यांनीच सांगावे की ५००० कोटींचा भ्रष्टाचार झाला असेल. असा टोलाही श्री राठी यांनी लगावला.

समृद्धी महामार्गाप्रमाणेच खरपुडी भागात होणाऱ्या सिडको प्रकल्पातही शेतकऱ्यांवर अन्याय होतो आहे, विशेष बाब म्हणून उद्योजक व त्यांचे सहकाऱ्यांचे जवळपास २७० एकरची रजिस्ट्री झाली आहे. प्रशासन आणि उद्योजक हे सर्व मिळून मिसळून करत असल्याचा आरोपही श्री राठी यांनी केला. तुघलकी- मनमानी कारभार सुरु आहे. मुल्यांकन समितीची एसीबी चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. एसीबी चौकशीत दूध का दूध पाणी का पाणी होईल. १.६९ कोटी उद्योजकांना दिले तर शेतकऱ्यांनाही १.६९ द्या. उद्योजक सतीश अग्रवाल यांचा प्रशासनावर दबाव आहे का? अधिकाऱ्यांनी कुणाच्याही दबावात काम करु नये, नियमात कामे करावीत. हे उद्योजक नाहीत दलाल असल्याचेही श्री राठी यावेळी म्हणाले.

## उद्योजक नव्हे ते भुमाफिया; ९00 कोटींचा भुखंड घोटाळा - माजी आ. सांबरे

सिडको सारखा प्रकल्प जिल्ह्यात असणे चांगले आहे, मात्र, इतर ठिकाणी जागा उपलब्ध असतांना अंगस्टन सारख्या त्रयस्थ संस्थेने सिडको प्रकल्प जालन्यात फिजीबल होऊ शकत नाही असा अहवाल दिला. या अहवालानंतरही सिडको प्रकल्प हा खरपुडी सारख्या भागात का? असा प्रश्न उपस्थित करत हा उद्योजकांचा मोठा भुखंड घोटाळा आहे. शासनाचे जवळपास १ हजार कोटींचे या ठिकाणी नुकसान होत आहे. हे उद्योजक नव्हे तर भुमाफिया असल्याचा गंभीर आरोप माजी आ. संतोष सांबरे यांनी केला आहे. या संदर्भातील सर्व कागदपत्रे आपल्याकडे उपलब्ध आहेत. लवकरच यासाठी वेगळी पत्रकार परिषद घेऊन संपूर्ण खुलासा करू असे देखील श्री सांबरे म्हणाले. केपीएमजी कंपनीमार्फत बोगस अहवाल तयार करुन घेण्यात आला आहे. आयुक्त, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांचेही अहवाल आहेत. वाळूज येथील सिडको प्रकल्पाचे जे हाल झाले तेच हाल खरपुडी येथील सिडको प्रकल्पाचे होणार आहेत. शासनाचे एक हजार कोटी बरबाद होणार आहे. त्यामुळे शासन-प्रशासनाने ज्यांना जागेचा मोबदला दिला आहे त्यांच्याकडून तो परत घेऊन हा प्रकल्प रद्द करावा, ज्या भागात ड्रायपोर्ट आहे, जालना- बदनापूर महामार्गावर इतरत्र हा प्रकल्प हलवावा असे आवाहन माजी आ. सांबरे यांनी केले आहे.

## प्रशासनाने कानातला मळ काढून ऐकावे - शेजुळ

सिडको प्रकल्पात जमिनीचा मोबदला देतांना शेतकरी आणि उद्योजक-व्यापारी असा मोजणीत भेदभाव केला जात असल्याचा आरोप शेतकरी समाधान शेजूळ यांनी केला आहे. काही दलालं या ठिकाणी सोडलेले आहेत, त्यांचे धागेदोरे प्रशाासनासह सिडकोच्या कार्यालयापर्यंत असल्याचे दिसून येते. व्यापाऱ्यांना १ कोटी ६७ लाख तर शेतकऱ्यांना केवळ ३० लाख रुपये शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे पाप हे करत असून वर म्हणतात देश कृषिप्रधान आहे. समाधान शेजूळ यांनी मी श्री राठी यांच्या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी आलो असल्याचे सांगत या समृद्धी बाधित शेतकऱ्यांचे आणि सिडको प्रकल्प बाधीत शेतकऱ्यांचे प्रश्न एकच आहे. येथील अधिकाऱ्यांनी कानातला मळ काढून ऐकायला या असे म्हणते श्री शेजूळ यांनी नगर रचनाकार विभागाने वीस लोकांचे खरेदीखत केले आहे. यात आयएएस अधिकारी देखील शेतकरी आहे. या व्यापाऱ्यांचे पोट हिस्से मॅच होत आहेत आणि शेतकऱ्यांचे पोट हिस्से मॅच होत नाही. हा काय प्रकार आहे. प्रशासनाने आंदोलनाची योग्य वेळी दखल घेणे गरजेचे असल्याचेही श्री शेजूळ यावेळी म्हणाले.

## चुकीचे मुल्यांकन गंभीर प्रकार - विष्णु पाचफुले

नांदेड-जालना समृध्दी महामार्गाचे प्रशासकीय मंडळीने केलेले मुल्यांकन हे अत्यंत अल्प असून, या गंभीर प्रकारासाठी सुरु असलेल्या आंदोलनाची प्रशासनाने तत्काळ दखल घ्यावी, अशी मागणी यावेळी शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले यांनी केली आहे. सिडको प्रकल्पातही अशाच अनेक गंभीर चुका घडल्या असून, त्याचे आपण स्वत:देखील बळी पडलो असल्याचेही ते यावेळी म्हणाले. श्री राठी यांच्या पत्रकार परिषदेत श्री पाचफुले यांनी खंत व्यक्त करत प्रशासन दखल घेत नसल्याचे सांगतांना त्यांचे ८५ गट सोडून आजूबाजूचे इतर ८४, ८७, १४५ अन्य गट घेतले. खुद्द आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितल्यानंतरही उपविभागीय अधिकारी श्री हरकळ यांनी दखल घेतली नाही. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईला मिटींग घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन नुकतेच दौऱ्यावर असतांना दिल्याचेही श्री पाचफुले यांनी सांगितले.



## ..अन् श्रीमंत हरकळ यांनी घेतली आंदोलकांची भेट

देवमुर्ती येथे नांदेड-जालना समृध्दी महार्गाच्या चुकीच्या मुल्यांकनाविरोधात सुरु असलेल्या आंदोलनाला आज शुक्रवारी (ता. ३१) सायंकाळी उपविभागीय अधिकारी श्रीमंत हरकळ यांनी भेट देवून आंदोलनाचे प्रमुख दिलीप राठी यांच्यासोबत चर्चा केली. तसेच मुल्यांकन आणि शेतकऱ्यांच्या मागण्या या विषयी माहिती जाणुन घेत त्याची माहिती आपण जिल्हाधिकाऱ्यांना देणार असल्याचे सांगत ज्याकाही त्रुटी राहिल्या असतील त्या दुर करण्याचा पुरेपुर प्रयत्न करुत. मात्र, दिलीप राठी आणि शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलू नये, अशी विनंतीदेखील त्यांनी यावेळी केली.

# जालन्याच्या युवकाच्या तांत्रिक ज्ञानाची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली दखल

## एआय आधारित सायबर सुरक्षा उपाययोजना आणि त्यांचा आधुनिक प्रशासनावर होणारा प्रभाव यावर पंतप्रधानांशी होणार विशेष चर्चा

**जालना । प्रतिनिधी -** कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि सायबर सुरक्षा क्षेत्रातील युवकाच्या अभ्यासपूर्ण विचारांची दखल थेट पंतप्रधान कार्यालयाने घेतली आहे. आयआयटीची तयारी करत असलेला अकरावी विज्ञान शाखेचा जालन्यातील अथर्व मिलिंद देवरे याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून एआय आधारित सायबर सुरक्षा उपाययोजना आणि त्यांचा आधुनिक प्रशासनावर होणारा प्रभाव याविषयी सखोल मांडणी केली होती. पंतप्रधानांनी त्याच्या या विचारांची प्रशंसा केली असून, एप्रिलमध्ये भेटीसाठी आमंत्रण दिले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २० जानेवारी रोजी अधिकृत पत्र पाठवून अथर्वच्या अभ्यासपूर्ण दृष्टिकोनाचे कौतुक केले आणि एप्रिल महिन्यात त्याच्यासोबत एका चर्चासत्राचे आयोजन करण्याचे जाहीर केले. या चर्चेत एआय आणि सायबर सुरक्षेतील नवकल्पना तसेच इतिहासाचा आधुनिक प्रशासनावर प्रभाव या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.

**औपचारिक ईमेलद्वारे पुष्टी**

२९ जानेवारी रोजी पंतप्रधान कार्यालयातर्फे अधिकृत ईमेलद्वारेही या **पान २ वर**

# तलाठ्याने गैरव्यवहार करत सावंगी येथील शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवले

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील सावंगी येथे फेब्रुवारी २०२४मध्ये झालेल्या नैसर्गिक आपत्ती गारपीट मुळे शेतीपिकांचे अतोनात नुकसान झाले. सावंगी येथील तात्कालीन तलाठी प्रभाकर शेंडेवाड यांनी गैरव्यवहार करत हेतुपुरस्कर शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवले असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

यासंदर्भात जाफ्राबाद तहसिलदारांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सन २०२४ मध्ये झालेल्या गारपिटीमुळे शेतमालाचे गहु, हरभरा, मका, कांदा या पिकांसह अन्य पिकांचे अतोनात नुकसान झाले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने नुकसान भरपाई दिली. परंतू संबंधीत तलाठी प्रभाकर शेंडेवाड यांनी ज्या शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात लाच रुपाने पैसे घेऊन त्यांनाच नुकसान भरपाईची आर्थिक मदत मिळवून दिली. एकाच गटात असलेल्या दोन शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असतांना एका शेतकऱ्यांना मदत मिळते आणि दुसऱ्या शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवण्यात येते. असे प्रकार मोठ्या प्रमाणात झालेले आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधीत तलाठी व त्यांना सहकार्य करणाऱ्यांविरोधात लाच लुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी तसेच जे शेतकरी लाभापासून वंचित आहेत त्यांना लाभ देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.



या निवेदनावर शेतकरी सर्जेराव वरगणे, अनिल वरगने, विठ्ठल वरगणे, श्री आढारे, रमेश वरगणे, अमोल वरगणे, विकास वरगणे, सतीश वरगणे, विनायक वरगणे, सुमन वरगणे, श्रींमता वरगणे, भारत वरगणे, बालाजी वरगणे, रवींद्र वरगणे, गबानी वरगणे, द्रौपदाबाई वरगणे, **पान २ वर**

# संपादकीय

## ग्रामीण भागात बिबट्यांची दहशत

पूर्वी क्वचितच नजरेस पडणारे बिबटे आता सर्रास नागरी वस्तीत दिसू लागले आहेत. दररोज कुठे ना कुठे बिबट्याने घुसखोरी केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. पूर्वी फक्त ग्रामीण भागात दिसणारे बिबटे आता पुण्या - मुंबई सारख्या मेट्रो शहरातही दिसत आहेत. पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरातील सोसायटी आणि कॉलनीतही बिबटे येत आहेत. बिबट्यांच्या या वाढत्या घुसखोरीमुळे नागरी वस्तीत भीतीचे सावट निर्माण झाले आहे. ग्रामीण भागात तर सर्रास बिबटे नजरेस पडत आहेत. सध्या ग्रामीण भागात ऊस तोडणी सुरू आहे. उसाच्या शेतात बिबट्यांची पिल्ले सापडत आहेत. ग्रामीण भागात बिबट्यांचा वावर नित्याचा बनला आहे. नागरी वस्तीत आणि शेतांमध्ये बिबट्यांचा वावर वाढल्याने बिबट्यांना पकडण्यासाठी वन विभागाकडून पिंजरे लावण्यात येतात. बिबटे नागरी वस्तीत घुसून पाळीव प्राण्यांचा फडशा पाडत आहे. काही वेळा तर बिबट्यांकडून नागरिकांवर जीवघेणे हल्ले देखील होत आहेत. दौंड, शिरूर या तालुक्यात बिबट्यांच्या हल्ल्यात एक महिला व दोन मुलांना जीव गमवावा लागला आहे. दौंड, शिरूर, आंबेगाव, जुन्नर या पुणे जिल्ह्यातील तालुक्यात बिबट्यांनी उच्छाद मांडला असून या भागात बिबट्यांची मोठी दहशत निर्माण झाली असून नागरिक भयभीत झाले आहे त्यामुळेच या नरभक्षक बिबट्यांना वन विभागाने ठार करावे अशी मागणी नागरिक करत आहेत अर्थात नरभक्षक बिबट्यांना ठार करणेच योग्य. याआधीही वन विभागाकडून नरभक्षक बिबट्यांना ठार मारण्यात आले आहे. काही वर्षापूर्वी जळगाव जिल्ह्यात एका नरभक्षक बिबट्याने उच्छाद मांडला होता. या नरभक्षक बिबट्याला वन विभागाकडून ठार मारण्यात आले होते. राज्यातील ग्रामीण भागासह शहरी भागातही बिबट्यांचा वावर वाढल्याने बिबट्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे पण बिबट्यांना नागरी वस्तीत घुसखोरी का करावी लागते याचाही विचार आपण करायला हवा. बिबट्यांचा जो नैसर्गिक अधिवास समजला जातो ते जंगल आज राहिले नाही. माणसांनी स्वतःच्या फायद्यासाठी जंगलतोड केली. बिबट्यांना लपण्यासाठी जी झाडे झुडपे होती त्याची कत्तल माणसांनी केली त्यामुळे बिबट्यांना नैसर्गिक अधिवास राहिला नाही. माणसांनी बिबट्यांच्या नैसर्गिक अधिवासात अतिक्रमण केले. माणसांनी बिबट्यांचा निवारा हिसकावून घेतला. माणसानेच आधी बिबट्याच्या निवाऱ्यात घुसखोरी केली त्यामुळे बिबट्याही आता नागरी वस्तीत घुसखोरी करीत आहेत. बिबट्यांनी जर नागरी वस्तीत घुसखोरी करू नये असे आपल्याला वाटत असेल तर बिबट्यांना पुन्हा त्याचा नैसर्गिक अधिवास मिळवून द्यायला हवा. यासाठी वन विभागाने ठोस उपक्रम राबवायला हवेत. जंगलतोड थांबवायला हवी. वृक्षतोड थांबवायला हवी. वन विभागाने वृक्षारोपण मोहीम राबवून ते वृक्ष जगवले पाहिजे. जंगलामध्ये रानावनामध्ये झुडपांची लागवड केली पाहिजे जर बिबट्यांना लपण्यासाठी झाडे झुडपे मिळाली तर ते शेतामध्ये येणार नाहीत.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ व ४ वरुन

### जालन्याच्या युवकाच्या ...

भेटीची पुष्टी करण्यात आली आहे. मात्र, सद्यस्थितीत भेटीची तात्पुरती तारीख असून, अंतिम तारीख निश्चित झाल्यानंतर अधिकृतपणे घोषणा केली जाईल, असे स्पष्ट केले आहे.

युवकाच्या अभ्यासू दृष्टिकोनाला राष्ट्रीय स्तरावर संधी - अथर्व देवरे याने एआय आणि सायबर सुरक्षा क्षेत्रात नवनवीन उपाय सुचवले होते. त्याच्या नवकल्पनांनी पंतप्रधानांचे लक्ष वेधून घेतले आहे. एआय क्षेत्रातील संशोधन आणि सुरक्षा उपाय भारताच्या डिजिटल इंडिया मोहिमेसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची पंतप्रधानांची भूमिका आहे.

**नव्या पिढीला प्रोत्साहन -** पंतप्रधान मोदींनी भारताच्या युवा प्रतिभेसोबत संवाद साधण्यास मी उत्सुक आहे, असे पत्रात नमूद केले आहे. एआय आणि सायबर सुरक्षा यांसारख्या क्षेत्रांमध्ये भारताचे योगदान वाढावे, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, असे म्हटले आहे.

अथर्व हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्सच्या माजी अध्यक्षा सौ. शकुंतला कदम आणि प्रा. नरहर कदम यांचा नातू आहे. जालन्यातील एका युवकाच्या प्रतिभेला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याने शहरात उत्साहाचे वातावरण आहे. युवकांनी संशोधन आणि नवकल्पनांमध्ये पुढाकार घ्यावा, असा संदेश या निमित्ताने मिळाला आहे.

### तलाठ्याने गैरव्यवहार ...

रामेश्वर वरगणे, शारदा वरगणे, भागुबाई वरगणे, ऋषिकेश वरगणे, पवन वरगणे, सर्जेराव वरगणे, फकीरबा वरगणे, अरूण वरगणे, अंकुश वरगणे, विशाल वरगणे, अर्जुन वरगणे, अनिता वरगणे, कौशल्याबाई वरगणे, आबाजी वरगणे, संतोष वरगणे, विजय वरगणे, राहुल वरगणे, दुर्गाबाई वरगणे, दिलीप वरगणे, प्रकाश वरगणे, अशोक वरगणे, शांताबाई वरगणे, मिराबाई वरगणे, दत्ता जगधने, नबाजी वरगणे, अनील वरगणे, पुंजाराम वरगणे, विनोद वरगणे, भानुदास वरगणे, गणेश वरगणे, नजीरखाँ अनिसखाँ पठाण, नायाबराव जाधव, पुंजाबाई जाधव, शारदा जाधव, मणकर्णाबाई तळेकर, राकेश धूत, गोविंद धूत, शशीकला धूत, नुरखाँ इब्राहीम खॉ पठाण, भरत जगधने, लक्ष्मण जगधने, विमलबाई जगधने, भारत जगधने अशी जवळपास सव्वाशेवर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### महाराष्ट्र राज्य ...

जिल्हा व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जालना येथे भेट द्यावी अथवा दुरध्वनी क्र. ०२४८२-२२३४२० यावर संपर्क साधावा, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

---

अखिल भारतीय धर्मसंघ आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या वतीने 'हिंदु राष्ट्र अधिवेशन' संपन्न!

# प्रयागराज येथील महाकुंभ मेळ्यात समस्त संत-महंतांची भारताला हिंदु राष्ट्र घोषित करण्याची एकमुखी मागणी !

**प्रयागराज -** भारताची संस्कृती, परंपरा आणि धर्म यांच्या संरक्षणासाठी, तसेच भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी भारताला धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्र घोषित केले जावे, अशी प्रमुख मागणी महाकुंभ मेळ्यातील 'हिंदु राष्ट्र अधिवेशना'त उपस्थित समस्त संत-महंत आणि हिंदुत्वनिष्ठ संघटना यांनी केली. अखिल भारतीय धर्मसंघ आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाकुंभ मेळ्याच्या पावन वातावरणात प्रयागराज येथे अखिल भारतीय धर्मसंघ, मोरी-संगम लोअर मार्ग चौराहा येथे हिंदु राष्ट्र अधिवेशन संपन्न झाले.

या अधिवेशनात बांगलादेश आणि पाकिस्तानमधील हिंदूवरील वाढते अत्याचार; बांगलादेशी-रोहिंग्या घुसखोरांमुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षेला निर्माण झालेला धोका; काशी, मथुरा यांसह अन्य मंदिरांच्या मुक्तीचा संवैधानिक लढा; हिंदू मंदिरांचे सरकारीकरण; भारतभर उत्सवांच्या वेळी हिंदूवर होत असलेली आक्रमणे; लव्ह जिहाद, धर्मांतर, आतंकवाद, दंगली आदी समस्यांवर हिंदु समाज, संघटना आणि संत-महंत यांना एकत्रित करून हिंदु राष्ट्र स्थापनेसाठीचे प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे विचार संत-महंत आणि हिंदुत्वनिष्ठ संघटना यांनी मांडले.

या वेळी हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे म्हणाले की, राज्यघटनेतील 'सेक्युलर' हा शब्द हटवून भारताला हिंदु राष्ट्र घोषित केले जावे, तसेच लोकसंख्या नियंत्रण, धर्मांतरबंदी, गोहत्याबंदी कायदे लागू केले जावेत, राज्यघटनेद्वारे अल्पसंख्यांकांसाठी करण्यात आलेली विशेष तरतूद काढण्यात यावी, अशा केंद्र सरकारकडून अपेक्षा आहे. अन्य धर्मियांच्या देशात तेथील बहुसंख्यांकाचाच हिताचा विचार होतो; मात्र भारत हिंदुबहुल राष्ट्र असतांनाही येथे हिंदूंच्या हिताचा रक्षण केले जात नाही. उलट हिंदूवर अन्याय करून हिंदूंना सापत्नतेची वागणूक मिळत आहे. यासाठी भारतात हिंदु राष्ट्र स्थापन होणे अनिवार्य आहे. तसेच हिंदु राष्ट्राची विचारधारा 'वसुधैव कुटंबकम्' अर्थात् सर्वसमावेशक असल्यामुळे त्यातून संपूर्ण मानवजातीचे हित जोपासले जाईल.

मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले की, भारतातील धर्मनिरपेक्ष सरकारे केवळ हिंदूंची मंदिरे बळकावून त्यातील धन घेण्याचा किंवा मंदिरांतील प्राचीन परंपरा बदलण्याचा प्रयत्न करतात; परंतु ते मशीद किंवा चर्च सरकारच्या नियंत्रणात आणू शकत नाहीत. त्यामुळे सर्व हिंदूंनी मिळून आपली सर्व



मंदिरे सरकारीकरणातून मुक्त केली पाहिजे. तरच आपल्या संस्कृतीचे रक्षण होईल. तसेच मंदिरांचे धन केवळ धार्मिक कार्यासाठीच वापरण्यात यावे.

हिंदु जनजागृती समितीचे उत्तर-पूर्व भारताचे मार्गदर्शक सद्गुरु नीलेश सिंगबाळ म्हणाले, शतकानुशतके आमच्या तेजस्वी हिंदु सभ्यतेवर आक्रमणे केली गेली; मात्र आता हिंदु संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाची चिन्हे स्पष्ट आहेत. काशी आणि मथुरा मुक्तीची मागणी भक्कम होत आहे. संभल येथे हिंदूंच्या नष्ट झालेल्या मंदिरांची मागणी होत आहे. ती न्यायाची मागणी आहे. आता लव्ह जिहादबरोबरच लँड जिहादच्या विरोधात हिंदूंना लढा द्यावा लागणार आहे.

---

## 'घर घर संविधान' नाविन्यपूर्ण पद्धतीने राबविल्या बद्दल माणगाव ग. शि. सुरेखा तांबट यांचा सिम्बॉल ऑफ नॉलेज संघटनेच्या वतीने जाहीर सत्कार

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या 'घर घर संविधान' या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी आद. श्रीमती सुरेखा तांबट मॅडम, गटशिक्षणाधिकारी, माणगाव यांच्या संकल्पनेनुसार नाविन्यपूर्ण पद्धतीने माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये करण्यात येत आहे. त्यांच्या ह्या कार्याची दखल घेत आज पंचायत समिती माणगाव येथे सिम्बॉल ऑफ नॉलेज डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा-युवती संघटना, माणगाव यांच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

भारतीय संविधान हे केवळ देशाचा राज्यकारभार कसा चालावा, एवढेच सांगणारे कायद्याचे पुस्तक नसून ते एक आदर्श जीवनपद्धती कशी असावी, हे सांगणारे एक महान तत्त्वज्ञान देखील आहे. म्हणूनच संविधान हे केवळ एक कायद्याची जंत्री नसून प्रत्येक भारतीय नागरिकाच्या सन्मानजनक तथा प्रतिष्ठपूर्वक जीवन जगण्याचा आधार असल्याचे सातत्याने सांगत संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण हे तालुक्यातील सर्व शिक्षक बंधू भगिनींच्या सहकार्याने सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये संविधान जनजागृती गटशिक्षणाधिकारी मॅडमनी सुचवलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून करत आहेत. माणगाव तालुक्यात 'घर घर संविधान' ह्या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण यांची समन्वयक म्हणून निवड करण्यात आलेली आहे. संविधानिक आदर्श व मुल्ये आपल्या माणगाव तालुक्यातील प्रत्येक गाव खेड्यात राहणाऱ्या नागरिकांनापर्यंत शाळांच्या माध्यमातून पोहोचवण्याचा जो संकल्प आद. श्रीमती सुरेखा तांबट गटशिक्षणाधिकारी, माणगाव यांनी केलेला आहे, तो निश्चितच अतिशय उपयुक्त असून कौतुकास्पद आहे. घर घर संविधानाचा हा 'माणगाव पॅटर्न' निश्चितच केवळ महाराष्ट्रालाच नव्हे, तर देशाला मार्गदर्शक ठरणारा आहे.



२६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिनाचे औचित्य साधून 'सिम्बॉल ऑफ नॉलेज डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा युवती संघटन माणगाव' यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांची 'संविधान सन्मान रॅली' व 'निबंध स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमात आद. सुरेखा तांबट मॅडम यांनी सर्व शाळांना सहभागी होण्याची सूचना केली होती. आद. तांबट मॅडम यांची संविधानाबद्दल असलेल्या आत्मियतेची दखल घेत सिम्बॉल ऑफ नॉलेज डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा युवती संघटन, माणगाव यांनी आज पंचायत समिती माणगाव येथे त्यांची भेट घेऊन 'संविधान प्रस्तावना' व 'पुष्पगुच्छ' देऊन त्यांचा सन्मान केला.

या प्रसंगी विस्तार अधिकारी आद. कुमार खामकर, आद धुळदेव कोळेकर, केंद्र प्रमुख आद. शंकर शिंदे, संविधान प्रचारक आद. नुरखाँ पठाण व माणगाव तालुक्यातील सर्व केंद्र प्रमुख व साधन व्यक्ती बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---


# महाकुंभातील चेंगराचेंगरी अत्यंत दुःखद घटना

मौनी अमावस्येच्या निमित्ताने प्रयागराजच्या महाकुंभमध्ये त्रिवेणी संगमात अमृतस्नान करण्यासाठी मंगळवारी मध्यरात्री भाविकांची अचानक गर्दी उसळली.यामध्ये चेंगराचेंगरी होऊन ३० भाविकांचा मृत्यू झाला व ६० हुन अधिक जण जखमी झाले.ही अत्यंत दुःखद आणि वेदना देणारी घटना आहे. जगात धार्मिक स्थळाला भेट देण्याकरता भारतातील प्रयागराज हे एकमेव ठिकाण असे आहे की याठिकाणी आतापर्यंत ७ करोड ६४ लाख लोकांनी गंगा स्नान केले हा सुद्धा एक इतिहासच म्हणावा लागेल.सध्या अनुमान आहे की १० करोड श्रध्दालुं आहेत चेंगराचेंगरीची घटना पहाता जवळपास असलेल्या घाटावरच स्नान करण्याच्या सूचना प्रशासनाने दिली आहे. चेंगराचेंगरीचे प्रकार गर्दी वाढल्याने होत असतात. चेंगराचेगरीसारख्या घटना पुन्हा-पुन्हा होवू नये यासाठी उत्तरप्रदेश सरकारनेच नाही तर भारतातील संपूर्ण राज्यांनी सतर्कता बाळगली पाहिजे.कारण आपल्या सामोर झालेल्या संपूर्ण घटना डोळ्यासमोर ठेवून पुढील कार्यक्रमाचे पाऊल देशातील राज्य सरकारांनी अंगीकारले पाहिजे.यामुळे चुका लक्षात येईल व जीवीत हानी टाळता येईल.आश्चर्याची गोष्ट म्हणजे या अगोदर प्रयागमध्ये अशाच प्रकारच्या घटना झालेल्या आहेत आणि त्याही मौनी अमावस्येला पहिली घटना १९५४ मध्ये झाली तेव्हा मौनी अमावस्येच्या अमृत स्नानच्यावेळी चेंगराचेंगरी झाली यात ८०० पेक्षा जास्त श्रध्दालुंचा मृत्यू झाला.यानंतर २०१३ ला मौनी अमावस्येच्या दिवशी प्रयागराज रेल्वे स्टेशनवर अचानक चेंगराचेंगरी झाली यात ४२ लोकांचा मृत्यू झाला. अशा घटना वारंवार होवू नये यासाठी सरकारने अलर्ट मोडवर असने गरजेचे आहे. उसळलेल्या गर्दीने दरवर्षी कुठे ना कुठे चेंगराचेंगरीचा प्रकार दिसून येतात २० दिवस अगोदर आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध तिरूपती बालाजी मंदिराजवळ वैकुंठ व्दार दर्शनाच्या टोकन वितरण केंद्रावर झालेल्या चेंगराचेंगरीत दिनांक ८ जानेवारी २०२५ ला ६ जणांचा मृत्यू झाला तर ४० हुन अधिक गंभीर जखमी झाले.देशात दरवर्षी अनेक ठिकाणी मंदिर परिसर, प्रवचन परिसर, किर्तन परिसर, गर्दीचे ठिकाण,रेल्वे स्टेशन किंवा अन्य ठिकाणी चेंगराचेंगरीचे प्रकार होतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी सुध्दा झालेली आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला प्रयागराज येथे दिसून आले. चेंगराचेंगरीचे प्रकार का होतात याला मुख्य जबाबदार कोण याचाही विचार आपण सर्वसामान्यांनी, आयोजकांनी, मंदिर प्रशासनाने,स्थानिक प्रशासनाने व सरकारने केला पाहिजे.कारण भाविकांनी भीड करायची व मंदिर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करायचे त्याचे प्रयचित्य भाविकांनी भोगायचे अशी परिस्थिती चेंगराचेंगरीच्या प्रकारात दिसून येते. भारतातील चेंगराचेंगरीच्या अनेक भयावह घटना झालेल्या आहेत यामध्ये ५ मार्च २०१० ला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला.भारतात बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे असुरक्षितता असते. अनेकदा दुर्गम ग्रामीण भागात, डोंगराळ प्रदेशात, टेकड्यांवर किंवा योग्य मार्ग नसलेल्या नदीकाठावर धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले जाते. अशा ठिकाणी असलेला तीव्र उतार, स्थळाची असमान भूरचना,अरुंद मार्ग, एकाच ठिकाणी भाविक एकत्रित येणे या कारणांमुळे धार्मिक कार्यक्रमामध्ये मोठे धोके निर्माण होतात. त्यातून चेंगराचेंगरीच्या घटना घडतात.धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम घेताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करते व दुर्घटना उद्भवतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शननं (आयजेडीआरआर)ने प्रकाशित केलेल्या २०१३ च्या अभ्यासात असं दिसून आलं की, भारतातील ७९ टक्के चेंगराचेंगरीचे ठिकाणे हे धार्मिक मेळावे आणि तीर्थयात्रेची ठिकाणे आहेत. विकसित देशांमध्ये बहुतेक चेंगराचेंगरी स्टेडियम, संगीत मैफिली आणि नाईट क्लबच्या ठिकाणी होतात. परंतु भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये गर्दीच्या आणि चेंगराचेंगरीच्या बहुतेक दुर्घटना धार्मिक स्थळांवर होतात, असे केरळ सरकारच्या भू आणि आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक फैसल टी. इलियास यांनी सांगितले. ४ जुलै २०२४ उत्तर प्रदेशातील हाथरस येथे एका धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरी होऊन किमान २७ जणांचा मृत्यू झाला,१७ फेब्रुवारी २०२४ उत्तर प्रदेशातील मथुरा येथील पूजनीय श्रीजी मंदिरात होळीपूर्वी झालेल्या कार्यक्रमादरम्यान चेंगराचेंगरीत किमान सहा भाविक बेशुद्ध पडले तर काही जण जखमी झाले,२४ डिसेंबर २०२३ मथुरा येथील बांके बिहारी मंदिरात गर्दीमुळे गुदमरून दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला,१ जानेवारी २०२२ जम्मू आणि काश्मीरमधील प्रसिद्ध माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले,२१ एप्रिल २०१९ तामिळनाडूच्या त्रिची येथील मंदिर उत्सवात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला,१० ऑगस्ट २०१५ झारखंडमधील देवघर शहरातील एका मंदिरात चेंगराचेंगरीत किमान ११ जणांचा मृत्यू आणि ५० जण जखमी झाले,१४ सप्टेंबर २०१४ आंध्र प्रदेशातील राजमुंद्री येथे 'पुष्करम' उत्सवाच्या उद्घाटनाच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी जमली होती गोदावरी नदीच्या काठावरील एका प्रमुख स्नानस्थळावर चेंगराचेंगरीत २७ यात्रेकरूंचा मृत्यू आणि २० जण जखमी झाले,२५ ऑगस्ट २०२४ ला मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यातील एका मंदिरात अफवेमुळे चेंगराचेंगरी झाल्यानं दहा यात्रेकरू ठार आणि २० हून अधिक जखमी झाले,१३ऑक्टोबर २०१३ मध्यप्रदेशातील दातिया येथील रतनगढ मंदिराजवळ चेंगराचेंगरीत ८९ जणांचा मृत्यू आणि १०० हून अधिक जखमी झाले,१४जानेवारी २०११ केरळमधील सबरीमाला मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत १०६ यात्रेकरू ठार तर १०० हून अधिक जखमी झाले,४ मार्च २०१० उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला, ३०सप्टेंबर २००८ राजस्थानमधील जोधपूरमधील मेहरानगड किल्ल्याच्या परिसरात असलेल्या चामुंडा देवी मंदिरात चेंगराचेंगरीत २४४ लोकांचा गुदमरून मृत्यू झाला,३ ऑगस्ट २००६ हिमाचल प्रदेशातील नैना देवी मंदिरात चेंगराचेंगरीत सुमारे १५० भाविकांचा मृत्यू आणि ४०० हून अधिक जखमी झाले,२६ जानेवारी २००५ ला पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाई जवळील मंदेर देवी मंदिरात वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किटमुळे ठिणग्या निघाल्यानं घाबरलेल्या हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मंदिराकडे जाणाऱ्या अरुंद मार्गावर गर्दी झाल्यानं चेंगराचेंगरी झाली लोक एकमेकांवर पडल्याने २९१ जणांचा मृत्यू झाला तर २०० हून अधिक जण जखमी झाले,२७ ऑगस्ट २००३ नाशिक कुंभातील पवित्र स्नानादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ३९ जणांचा मृत्यू झाला तर १४०जण जखमी झाले.चेंगराचेगरीच्या भयावह घटना पहाता त्या टाळण्यासाठी मंदिर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी किंवा भाविकांनी गर्दीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याठिकाणी आपण जावे की नाही याचा गंभीरतेने विचार करूनच गेले पाहिजे. प्रयागराजमधील कुंभमेळावा १३ जानेवारीला सुरू झाला व त्याची सांगता २६ फेब्रुवारीला होईल. तब्बल ४५ दिवसांचा हा भव्य कार्यक्रम आहे.त्यामुळे भाविकांनी चेंगराचेंगरीची गंभीर घटना पहाता पुढील पाऊल सावधगिरीने उचलावे व स्थानिक प्रशासन,आयोजक व सरकारने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करुन सहकार्य करावे.जेनेकरून पुन्हा चेंगराचेंगरीसारख्या घटनांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्यावी. जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार (माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर) मो.नं.९९२१६९०७७९,**

### येनोरा येथे संत नामदेव बाबा मंदिराचे लोकार्पण

# धर्माच्या कामासाठी आम्ही कधीही सदैव तत्पर- राहुल लोणीकर





**परतुर । प्रतिनिधी -** धर्मकार्यासाठी, आपल्या वडिलांनी दिलेला कानमंत्र हा खऱ्या अर्थाने महत्त्वाचा असून, आमदार बबनराव लोणीकर साहेबांच्या माध्यमातून आपण मतदार संघामध्ये, सदैव धार्मिक सांस्कृतिक सामाजिक कार्यामध्ये सर्वजण हिताय हा विचार पुढे घेऊन जाणार असल्याचे भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी सांगितले. ते येनोरा येथे संत नामदेव बाबा समाधी मंदिराचे लोकार्पण सोहळ्याप्रसंगी बोलत होते

यावेळी पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की , माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी देव देश आणि धर्मासाठी सदैव स्वतः ला झोकून देऊन काम केलेलं असून त्यांच्या प्रेरणेतून मी नियमितपणे जिथे कुठे सत्कर्म असेल धर्मकार्य असेल तिथे आवर्जून उपस्थिती लावत त्या ठिकाणच्या समस्या जाणून घेणारा भावनाशील व्यक्ती असून वडिलांनी दिलेली शिकवण कधी विसरणार नसून , समाजातील दिन दलित पीडित धर्मपरायण सर्वसामान्य जनतेसाठी काम करत असून यापुढेही करत राहणार असल्याचे सांगितले पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की, नितीन जोगदंड हा माझा बालमित्र असून, खऱ्या अर्थाने समाज सेवेसाठी वाहून घेणारा कार्यकर्ता आहे त्यामुळे आपण नितीन जोगदंड आणि त्यांच्या सगळ्या टीमचे अभिनंदन करत असून म ाजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या माध्यम ातून येनोरा व परिसरातील गावचा विकास करण्यासाठी कटिबद्ध आहोत, खऱ्या अर्थाने राजकारणात प्रवेश करताना म ला ज्यांनी ऊर्जा दिली त्यातील एक तुमचे गाव असून आज या गावांमध्ये नामदेव महाराज समाधी सभा मंडप उद्घाटन समारंभासाठी मला बोलावले याबद्दल सदैव आपल्या सर्वांचे ऋण फेडण्यासाठी तत्पर राहणार असल्याचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी सांगितले

यावेळी जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक भक्तांची उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांच्या आंदोलनाला व्यापारी महासंघाचा पाठींबा

### आज व्यापाऱ्यांनी पुकारला बंद

**जालना । प्रतिनिधी -** नांदेड - जालना समृद्धी महामार्गासाठी संपादित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे सरकारने मूल्यांकन अत्यंत कमी काढले असून संपादित होणाऱ्या जमिनीचे बाजारभावाने मूल्यांकन काढून ते मिळावे या मागणीसाठी देवमूत येथे शेतकरी उपोषणास बसले आहे. त्यांच्या या उपोषणास जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे संपूर्ण समर्थन असून त्यांची मागणी सरकारने गंभीरतेने घेऊन त्यांना त्यांच्या संपादित होणाऱ्या जमिनीचा योग्य म ोबदला देण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना ५ फेब्रुवारी रोजी आत्मदहनाचा घेतलेला निर्णय मागे घेण्यास प्रवृत्त करावे असे व्यापारी महासंघ सरकारकडे कळकळीची विनंती करत आहे. महामार्गासाठी संपादित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीस योग्य भाव मिळावे यासाठी उपोषण करणाऱ्या शेतकऱ्यांना पाठिंबा म्हणून उद्या जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने पूर्ण व्यापार बंदचे आव्हान करण्यात येत आहे. आज ही वेळ शेतकऱ्यावर आली आहे उद्या व्यापाऱ्या वर्गावर सुद्धा येऊ शकते त्यासाठी आपल्याला एकजुटीने शेतकऱ्याच्या पाठीमागे उभे राहणे निकडीची आहे तरी सर्व व्यापारी वर्गाने उद्या बंद मध्ये सहभाग घेऊन सहकार्य करावे असे आव्हान जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने करण्यात येत आहे.

# पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना जिल्हा दौरा

**जालना । प्रतिनिधी -** राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील सुधारित कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. शनिवार दि. १ फ ेब्रुवारी २०२५ रोजी यशश्री निवासस्थान परळी येथून शासकीय वाहनाने सकाळी १०.४५ जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आगमन. सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. दुपारी १२.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल समिती बैठकीस उपस्थिती. दुपारी १ वाजता भाजपा जिल्हा कार्यालयास सदिच्छा भेट, दुपारी २ वाजता शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या नवा मोंढा येथील निवासस्थानी भेट देतील. दुपारी २.३० वाजता शासकीय विश्रामगृहात आगमन व राखीव. सायंकाळी ७ वाजता शासकीय विश्रामगृह येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

# जालना समाजकार्य महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन



जालना । प्रतिनिधी - कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयात दि. ३० जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रपिता म हात्मा गांधी यांना पुण्यतिथी निमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. मधु खोब्रागडे हे उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वप्रथम डॉ. मधु खोब्रागडे यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. मधु खोब्रागडे व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ. दीपक बुक्तरे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जीवन व कार्या विषयी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा.डॉ. सुधीर गायकवाड,प्रा. डॉ.नरसिंग पवार प्रा डॉ रेणुका बडवणे. प्रा.डॉ.बालाजी मुंडे,प्रा. डॉ. प्रवीण कणकुटे,जगन्नाथ मलवार, प्रकाश दांडगे,आकाश आढे, योगेश पवार, रोहन राठोड आदी उपस्थित होते.

# गौ भारत भारती द्वारे प्रकाशित 'यादों के गुब्बरे' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ संपन्न

**मुंबई -** प्रसिद्ध गुजराती कवी, लेखक, साहित्यिक, समाजसेवक दीपक देसाई लिखित 'यादों के गुब्बरे' या काव्यसंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन क्लासिक क्लब अंधेरी येथे दीपक यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे आमदार हारुन खान, प्रशांत काशीद उपाध्यक्ष एकता मंच, अभिजित राणे मुंबई भाजपा. सचिव, कामगार नेते, चित्रपट अभिनेते सुनील पाल, एसीपी संजय पाटील, कवयित्री झीनत एहसान कुरेशी, संगीतकार दिलीप सेन इत्यादींच्या उपस्थितीत झालेल्या जाहीर सभेत हा समारोप झाला.

गौ भारत भारती द्वारे प्रकाशित, हे पुस्तक त्याच्या पहिल्या आवृत्तीपासूनच लोकप्रिय आहे. रहेजा क्लासिक क्लबमध्ये झालेल्या या कार्यक्रमात कामगार संघटनेचे अभिजित राणे, एसीपी संजय पाटील, आमदार हारून खान, सुनील पाल, रमेश गोयल, झीनत एहसान कुरेशी, दिलीप सेन, प्रशांत काशीद, कशिश खंडेलवाल, डिझायनर आर राजपाल, गायक एनके नरेश उपस्थित होते. मुंबई. संगीतकार एस.पी. सेन, प्रिया सेन, सुरुची शर्मा, डॉ. कृष्णा चौहान, भागवत तिवारी, अब्दुल कादिर इत्यादी उपस्थित होते.

विशेषतः, महाराष्ट्रातील कराड येथील प्रसिद्ध ज्योतिषी ज्योति कुमारी यांनी येऊन सहभाग घेतला. आणि संस्थेला आशीर्वाद दिले. या कार्यक्रम ात इतरांसह, अनेक मॉडेल्स, अभिनेते आणि चित्रपटसृष्टीतील कलाकार आणि भाभी जी घर पर है या मालिकेतील कलाकार उपस्थित होते.

यावेळी झाकीर रहबर, रुस्तम घायाळ आणि झीनत कुरेशी यांनी कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे संचालन गौ भारत भारतीचे संपादक संजय अमन यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात गायक आणि संगीतकार प्रकाश तिवारी मधुर यांनी त्यांच्या सुमधुर आवाजाने केली. यावेळी दीपक देसाई आणि त्यांचे कुटुंब आणि गौ भारत भारती यांनी आदर म्हणून सर्व पाहुण्यांना 'आठवणींचा फ ुगा' ही प्रतीकात्मक भेट दिली. कर भरला गेला.

शेवटी दीपक देसाई दीपक आणि संजय अमन यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



# रासेयो शिबिरातील स्वयंसेवकांनी केली रामनगर येथील स्मशानभूमीची स्वच्छता




**सिंधीकाळेगाव । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील रामनगर ग्रामपंचात कार्यालयात जालना समाजकार्य महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय शिबीर चालू असुन शिबिराच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी रामनगर या ठिकाणी असलेल्या स्मशानभूम ीची संपूर्ण स्वच्छता करून एक नवीन उपक्रम राबविला आहे व गावाकऱ्यांना या द्वारे स्वच्छतेच्या जागृतीबाबत संदेश दिला आहे.

जालना समाजकार्य म हाविद्यालयाच्या वतीने २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी या दरम्यान रामनगर या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. यादरम्यान दररोज विविध प्रबोधनाचे कार्यक्रम आणि श्रमदान केले जात असून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गावातील स्मशानभूमी ची संपूर्ण स्वच्छता करून एक नाविन्यपूर्ण श्रमदानाचा उपक्रम राबविला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के व प्रशासकीय अधिकारी रमेश गजर यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण कनकुटे यांच्या संकल्पनेतून या उपक्रमामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते यावेळी रामनगरचे सरपंच ॲड. गोपाल मोरे यांची विशेष उपस्थिती होती. या उपक्रमाम ध्ये महाविद्यालयाचे राजू वाघम ारे, योगेश पवार , आकाश आडे, रोहन राठोड, संदेश चव्हाण, योगेश खोसे यशोधन सराटे, दीपक राठोड, सोमेश गिरी, प्रथम सावंत, अक्षय दंडाईत, शुभम फुके, बाळू काळे, इत्यादी विद्यार्थ्यांनी या श्रमदानात सहभाग नोंदवला

# लॉयन्स क्लब राबविणार मुलींसाठी मोफत सर्वाइकल कॅन्सर लसीकरण प्रकल्प

**जालना-** लायन्स क्लबच्याच्यावतीने आणि जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने ९ ते १८ वयोगटातील मुलींसाठी मोफत सर्वाइकल कॅन्सर लसीकरण प्रकल्प राबवण्यात येणार असून, अंतर्गत १८ फेब्रुवारी रोजी शहरातील व ग्रामीण ग्रामीणमधील १८ शाळांम धील दीड हजार मुलींचे लसीकरण करण्यात येणार आहे, अशी माहिती क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्डा यांनी दिली. यासंदर्भात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांच्यासह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील आणि जिल्हा शिक्षण अधिकारी यांच्यासोबत बैठक व चर्चा झाली. यावेळी लायन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्डा, सचिव मंजु श्रीमाली, जयप्रकाश श्रीमाली व अतुल लड्डा उपस्थित होते. या प्रकल्पाला जिल्हा स्तरावरील सर्व अधिकाऱ्यांनी अत्यंत सकारात्म क प्रतिसाद दिला. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीस गती मिळावी, यासाठी वर्षा मीना यांनी तातडीने प्राचार्य व मुख्याध्यापकांसाठी नियमावली तयार करून त्यांना यासंदर्भात सूचना पाठवण्याबाबतचे निर्देश शिक्षण अधिकाऱ्यांना दिले. लसीकरणासाठी मुंबईहून तज्ञ डॉक्टरांची टीम व स्थानीय डाक्टर व परीचारीका द्वारे एकूण १हजार ५०० किशोरवयीन मुलींना सर्वाइकल कॅन्सरविरोधी लस देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील आरोग्यसेवा एक नवा मापदंड निर्माण करणार असून, मुलींच्या आरोग्यासाठी मोठे पाऊल उचलले जाणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी लायन्स क्लबच्या सर्व सदस्यांनी पुढाकार घेतला आहे. सदस्यांना प्रकल्पातील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या असून, प्रत्येक शाळेत जाऊन मुलींना आणि त्यांच्या पालकांकडून सहमती फॉर्म भरून घेणे, आधार कार्ड संलग्न करणे, ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# महादीप परीक्षेत जिल्हा परिषद शाळेची जिल्हास्तरीय निवड



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** खेड्यातील गोरगरीब मुलांनाही पुढच्या आयुष्यात स्पर्धा परीक्षा देऊन यशस्वी होता यावे त्यासाठी बालवयातच त्याचा सराव व्हावा म्हणून जिल्हा परिषदेच्या माध्यम ातून 'महादीप'उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमा अंतर्गत जाफराबाद तालुक्यातील देळेगव्हाण येथील जिल्हा परिषद शाळेच्या दोन मुलीची जिल्हास्तरीय निवड झाली आहे.

देळेगव्हाण जिल्हा परिषद शाळेतील वर्ग ८ ची श्रावणी उत्तम कापसे,व वर्ग ६ आराध्या गणपत बनकर या दोन मुलींनी महादीप अंतर्गत झालेल्या तालुका स्तरीय परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्याने जिल्हास्तरीय होणाऱ्या या परीक्षेसाठी त्या पात्र ठरल्या आहेत

या निवडीबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री कव्हळे सर,श्री देठे सर, श्री ,खर्डे सर, श्री कणखर सर,कुलकर्णी मॅडम,घोडके मॅडम,वाघ सर,म ाटे सर, म्हस्के सर,आदींसह गावकऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रासाठी ७ फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव सादर करावेत

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील जालना तालुक्यातील सेवली, देवमुर्ती आणि मंठा तालुक्यातील तळणी तसेच भोकरदन तालुक्यातील वालसावंगी येथे कौशल्य विकास केंद्र स्थापन करावयाची आहेत. तरी जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रमोद म हाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षण भागीदार नियुक्त करण्यासाठी संस्थांनी जालना येथील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात https://tinyurl.com/32yvhytw या लिंकवरून प्रस्ताव डाऊनलोड करून शुक्रवार दि.७ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी केले आहे.

# संजिवनी सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल जालना यांच्या सहकार्याने साळेगाव घारे येथे मोफत आरोग्य शिबीर

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील साळेगाव घारे येथील सरपंच संदिप घारे यांच्या वाढदिवसा निमित्त व संजिवनी सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल जालना यांच्या सहकार्याने भव्य मोफत आरोग्य शिबीर ठेवण्यात आले आहे.

शिबीर दिनांक ०२/०२/२०२५ वार रविवार रोजी वेळ सकाळी ९ ते २ पर्यंत आहे.या शिबीराला डॉ बळीराम बागल.डॉ अमोल पाटील. डॉ शिवदास मिरकड.डॉ कैलास राजगुरू.डॉ चैतन्य कदम.डॉ निशांत गोयल.डॉ तुषार अग्रवाल. डॉ प्रचुर शेख दहिवाल.डॉ शालिकराम जाधव. डॉ अमोल जाधव.डॉ संदिप पाटील हे डॉक्टर उपस्थित राहणार आहे. शिबीराचे ठिकाण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साळेगाव घारे येथे आहे.

या शिबीराचा परिसरातील सर्वांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच संदिप घारे यांनी केले आहे.

# भारतीय जैन संघटनेतर्फे प्रतिभावान युवकांचा राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरव



**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जैन संघटना, जिल्हा जालनाच्यावतीने समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवकांचा युवा राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या सोहळ्यात वैद्यकीय, शिक्षण, सामाजिक सेवा, गोसेवा आणि बांधकाम क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या युवकांना गौरविण्यात आले.

कोठारी इंटरनॅशनल स्कूलमध्ये पार पडलेल्या या सोहळ्यात भारतीय जैन संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष विनयकुमार कोठारी, वरिष्ठ सदस्य विजयराज सुराणा, जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन तसेच पवन सुराणा, संतोष ओस्तवाल, संजय लव्हाडे, संकेत देसरडा, चैतन्य वायकोस, पंकज जैन आणि डॉ. जितेंद्र जैन आदी मान्यवरांच्या हस्ते सौ. सोनल रुणवाल (वैद्यकीय), कुशल देसरडा (बांधकाम), वीरेंद्र अलिझार (गोसेवा), अक्षय जैन (सामाजिक कार्य) आणि जय पोकरना (शैक्षणिक) यांचा युवा राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात विनयकुमार कोठारी म्हणाले की, आजच्या युवकांमध्ये अपार ऊर्जा आहे. ही ऊर्जा केवळ स्वतःच्या प्रगतीसाठीच नाही तर सम ाजाच्या उन्नतीसाठीही वापरणे आवश्यक आहे. आज ज्या युवकांचा सन्मान केला जात आहे, त्यांनी आपल्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केले आहे आणि भविष्यातही समाजासाठी आदर्श निर्माण करतील, असा मला विश्वास आहे. जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन म्हणाले की, कोणतेही कार्य लहान किंवा मोठे नसते, तर त्याला आपण कशा पद्धतीने प्रामाणिकपणे करतो, यावर यश अवलंबून असते. भारतीय जैन संघटना नेहमीच समाजाच्या हिताचे कार्य करीत आली आहे. यापुढेही आम्ही युवकांना प्रोत्साहन देत राहू. सन्मानित युवकांनी आपल्या यशाची प्रेरणा इतरांना द्यावी आणि सम ाजासाठी अधिक योगदान द्यावे, असे ते म्हणाले.

# सरपंचांचा पती कारभार करत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप

## गैरकायदेशीरपणे सरपंचाचे अधिकार वापरल्याप्रकरणी कारवाईची मागणी

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील मौजे सावंगी येथील जागेच्या क्षेत्रफळाच्या दुरुस्ती करण्यासाठी सरपंच यांचे पती हेच सरपंचांच्या खुर्चीवर बसून सरपंचाचे गैरकायदेशीरपणे अधिकार वापरत असून मुळ दस्तावर खाडाखोड करून अरेरावीची भाषा वापरत असल्याचा आरोप करत सरपंच पतीच्या गैरकारभाराची चौकशी करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

या संदर्भात जाफ्राबाद पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मौजे सावंगी येथील ग्रामपंचायत मिळकत क्र २१५ सीटी सर्व्हे क्र.. १९१/२ ची मुळ रेकॉर्डला नोंद २२x३३ अशी होती. परंतु संबंधीत ग्राम पंचायत रेकॉर्डमध्ये खाडाखोड करून जागेचे क्षेत्रफळ कमी करण्यात आले आहे. जे चुकीचे आणि अन्यायकारक आहे. यासंदर्भात ग्रामपंचायतमध्ये जावून विचारणा केली असता सरपंच यांच्या खुर्चीवर त्यांचे पती बसलेले होते. संबंधीत सरपंचाचे पती हेच कारभार पाहत होते. त्यांनी तुला काय करायचे ते कर म्हणत अपम ानास्पद आणि अरेरावीची भाषा वापरली आहे. मुळ रेकॉर्डला असलेले क्षेत्र २२x३३ हे क्षेत्रफळ कायम करण्यात यावे, तसेच सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व सरपंचाच्या पतीच्या गैरकारभाराची चौकशी करून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. नमुना नंबर आठ च्या नकलाचे आणि मुळ रेकॉर्डवर केलेल्या खाडाखोडीची चौकशी करून मुळ रेकॉर्डनुसार दुरुस्ती करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

निवेदनावर उद्धव रामचंद्र वरगणे, प्रकाश रामचंद्र वरगणे यांच्या साक्षऱ्या आहेत.

# व्हाईस ऑफ मीडियाच्या साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्षपदी सुयोग खर्डेकर यांची नियुक्ती



**जालना । प्रतिनिधी -** व्हाईस ऑफ मीडियाच्या साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्षपदी सुयोग खर्डेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. येथील हॉटेल म धुबन मध्ये दि. ३० जानेवारी २०२५ रोजी बैठक पार पडली. या बैठकीस प्रामुख्याने महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी, दैनिक विंगचे जिल्हाध्यक्ष राजेश भालेराव, सचिव रविकांत दानम, लियाकत अली खान उपस्थिती होती. तर व्हाईस ऑफ मिडीयाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांची ऑन लाईन उपस्थिती होती.

व्हाईस ऑफ मिडीया ही पत्रकारांची संघटना असून ती जवळपास चाळीस देशात कार्यरत असून भारताची सर्वात मोठी संघटना आहे. या संघटनेचे संपूर्ण भारतात जवळपास तीन लाख सभासद आहेत. आणि या संघटनेचे वेगवेगळे २१ विंग आहेत. यात दैनिकांसाठी वेगळी, साप्ताहिकांसाठी वेगळी, तर उर्दू दैनिक आणि साप्ताहिकांसाठी वेगळी विंग आहे.

महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या बैठकीत प्रारंभीच सुयोग खर्डेकर यांच्या नावाची चर्चा करण्यात आली आणि तेच या पदासाठी योग्य उमेदवार असल्याचे सर्वानुमते ठरविण्यात आल्यानंतर जिल्हाध्यक्ष म्हणून सुयोग खर्डेकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. यावेळी देवचंद सावरे, युवराज कुरिल, कहैय्या रामरख्या मि तवा, मुकेश परमार, शिवाजी बावणे, बासीत बेग, नटवर किल्लेदार, कादरी हुसेन, सय्यद अफसर, शब्बीर पठाण, सचिन सर्वे आदींची उपस्थिती होती. या बैठकीचे सुत्रसंचालन गोपाल गोमंतीवाले यांनी केले.

# अंतरवाली टेंभी येथे उद्या मोफत नेत्र तपासणी व सर्व रोग निदान शिबिर

**जालना । प्रतिनिधी -** लायन्स क्लब ऑफ जालना व जालना हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. २ फेब्रुवारी रोजी घनसावंगी तालुक्यातील अंतरवाली टेंभी येथे मोफत नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. लॉ. डॉ. सुयोग कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमि त्त हे विशेष शिबिर घेण्यात येत आहे. अंतवाली टेंभी येथील श्रीराम मंदिर परिसरात सकाळी ९. ३० ते दुपारी ३ या वेळेत हे शिबिर होईल. सर्वरोग निदानासह मोफत नेत्रतपासणी, मोतीबिंदूचे निदान झालेल्यांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. या शिबिराचा अंतरवाली टेंभी आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन लायन्स क्लबच्या अध्यक्ष लॉ. जयश्री लड्डा, सचिव लॉ. मंजू श्रीमाली, कोषाध्यक्ष लॉ. कल्पना बियाणी, प्रकल्प प्रमुख लॉ. अतुल लड्डा, लॉ. डॉ. सुयोग कुलकर्णी, लॉ. राजेश लुणिया, लॉ. ॲड. भरत मंत्री, लॉ. विजय दाड, लॉ. द्वारकादास मुंदडा, महेश कोल्हे, पुंडलिक पाटोळे, संदीप शर्मा, शंकर शिंदे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची थकीत कर्ज प्रकरणासाठी सवलत योजना

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास म हामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एक रक्कमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यास थकीत व्याज रक्कम ेत ५० टक्के सवलत देण्याबाबतची एक रक्कमी परतावा योजना दि.३१ मार्च २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. त्यानुसार महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांनी सदर योजनेचा फायदा घेवून कर्ज मुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित यांचे जिल्हा कार्यालय, जालना यांच्या विविध कर्ज योजनेअंर्तगत जालना जिल्ह्यातील इतर मागास प्रर्वगातील लाभार्थींना स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने कर्ज वितरीत केले आहे. जिल्हा कार्यालयाकडून वाटप झालेल्या थकीत लाभार्थींनी म हामंडळाकडून थकीत व्याज दरात ५० टक्के सवलत दि.३१ मार्च २०२५ पर्यंत देण्यात येणार आहे. या एक रक्कमी परतावा योजनेचा लाभ घेवुन सर्व संबधित लाभार्थ्यांनी थकीत मुद्दल व व्याज रक्कमेचा भरणा करुन कर्ज खाते बंद करण्यासाठी जिल्हा कार्यालय,

पान २ वर

युवा आदर्श

**नियंता ...**

बेधडक रहावे सदा
करू नये उगा चिंता
जरूर करावे चिंतन
सुटेलं अलगद गुंता
दुर्गुण पाही शिराया
भोवताली आकोंता
विकार कैक मातले
शांत करा आकांता
संत सज्जन संगती
हळूहळू झडे अहंता
दूर होणारं हळहळ
कळता खरी अर्हता
पश्चात्ताप प्रमादांचा
ईश्वरांपाशी ती क्षंता
समस्त मार्ग बंदिस्त
शरण जायचे नियंता
कोणकधी कसे चुके
माहीत असते अनंता
भरली भांडारें प्रेमाची
कृपाप्रसाद न निवंता
अतर्क्य तो गणाधिश
कळेना साधु महंता
विघ्न हरेलं विघ्नहर्ता
शरण जाता एकदंता

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा झाडे जगवा**




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.